प्रेसनोट ता २९/०८/२०१९

# शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर

## हरवलेल्या जेष्ठ महिलेस दिले नातेवाईकांचे ताब्यात

दि.१८/०८/२०१९ रोजी दुपारी १६.०० वा चे सुमारास के.एस.राठोड पोलीस उप-निरीक्षक हे शिवाजीनगर पोलीस चौकी येथे कार्यरत असतांना त्या दरम्यान एक जेष्ठ महिला वय- ६० वर्षे रा. मु.पो. रोहना, ता.आर्वी, जिल्हा वर्धा ही पंधारा लोकांबरोबर आळंदी येथून दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेण्यासाठी मनपा बसस्टाप या ठिकाणी आले व तेथून दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेण्यासाठी पायी जाण्यास निघाली असता काही अंतरावर गेल्यावर त्यांच्या सोबत असलेला त्यांचा भाचा नामे सुनिल महादेवराव माने यास त्या न दिसल्याने त्याने शिवाजीनगर पोलीस चौकी येथे सदर महिला मिसिंग झाल्याबाबत तक्रार देण्यास आली असता त्यावेळी लागलीच के.एस.राठोड यांनी शिवाजीनगर मार्शल वरील पोलीस कर्मचारी पो.हवा. भेगडे व पो.शि.कदम तसेच मॉर्डन मार्शल वरील कर्मचारी पो.शि.राऊत व पो.हवा. वाघवले व तपास पथकातील कर्मचारी पो.शि.शिरकांडे व पो.शि.जगताप यांना तसेच हद्दीत असणारे पोलीस मित्र यांच्या व्हॉटसअपवर सदर महिलेचा फोटो पाठवून शोधण्या बाबत सांगितले तसेच पोउनि के.एस.राठोड हे स्वतः पो.ना.सावंत यांचेसह मनपा बस स्टॉप शिवाजनगर गावठाण जाऊन शोध घेत असतांना पो.शि.जगताप व शिरकांडे यांना सदरची महिला ही सांयकाळी ०७.०० वा चे सुमारास नाना नानी पार्क या ठिकाणी फिरत असतांना दिसल्याने तिस शिवाजीनगर चौकीस घेऊन आल्याने तिचा भाचा सुनिल महादेवराव माने याचेशी संपर्क साधून सदर महिलेला त्यांच्या ताब्यात सुखरुप दिले आहे.

तरी सदरबाबत आम्ही वपोनि श्री. बाळासाहेब कोपनर सो यांचे मार्गदर्शन घेवून योग्य ती कारवाई करण्याबाबत आदेश दिल्याने पोलीस उप-निरीक्षक के.एस.राठोड, शिवाजीनगर मार्शल पोलीस कर्मचारी पो.हवा. भेगडे व पो.शि.कदम तसेच मॉर्डन मार्शल वरील कर्मचारी पो.शि.राऊत व पो.हवा. वाघवले व तपास पथकातील कर्मचारी पो.शि.शिरकांडे व पो.शि.जगताप यांनी चांगली व उत्तम कामगिरी करून सदर महिलेस सापडून दिल्याने त्यांनी सर्व पोलीसांचे आभार मानले आहे अशी उत्तम कामगिरी करण्यात आली आहे.

